मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शाळेतील मुलींच्या सुरक्षिततेबाबत सर्वांनी जबाबदारी घेणे आवश्यक

## आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर सभागृहात आयुक्त शेखर सिंह यांचे प्रतिपादन : विद्यार्थी सुरक्षा- संवाद सत्रात उपस्थितांसमवेत संवाद साधताना बोलत होते.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शाळांमध्ये भविष्यातील सुजाण नागरिक घडत असतात. विद्यार्थ्यांची सुरक्षा हा विषय खूप संवेदनशील असून त्याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत सर्वांनी जबाबदारी घेणे आवश्यक असून याबाबत शहरातील सर्व शाळांमध्ये सर्वांनी अत्यंत सजग राहून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत आवश्यक त्या उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे. यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, पालक यांच्यासह महापालिका आणि पोलीस प्रशासन यांच्यातील समन्वय देखील महत्वाचा आहे, असे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले.



विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने शहरातील महापालिकेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतील तसेच खासगी शाळांतील सर्व मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समितीचे प्रतिनिधी यांच्यासमवेत विद्यार्थी सुरक्षा- संवाद सत्राचे आयोजन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आज आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर सभागृहात करण्यात आले होते, त्यावेळी उपस्थितांसमवेत संवाद साधताना आयुक्त सिंह बोलत होते.

या संवादसत्रास पद्मश्री गिरीश प्रभुणे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे आयुक्त विनयकुमार चौबे, अतिरिक्त पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त स्वप्ना गोरे, अतिरिक्त वाहतूक परिवहन अधिकारी सुरेश आव्हाड, पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उप आयुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, पंकज पाटील, प्रशासन अधिकारी संगिता बांगर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक प्रशासन अधिकारी रजिया खान, माध्यमिक प्रशासन अधिकारी राजीव घुले, माध्यमिक शिक्षण अधिकारी बुधा नाडेकर, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्य समितीच्या जिल्हा सल्लागार डॉ.जयश्री सारस्वत , अर्पण संस्थेच्या प्रतिनिधी नीलम परब, मुस्कान फाऊंडेशनच्या प्रतिनिधी मनिषा कांबळे तसेच महापालिका, खासगी शाळांचे मुख्याध्यापक, संस्थेचे अध्यक्ष, व्यवस्थापक आणि शिक्षक उपस्थित होते.

> “ विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शाळांमध्ये विशाखा समिती स्थापन करणे अनिवार्य आहे. आवश्यक ठिकाणी सी.सी.टी.व्ही. बसविण्यात येऊन त्याबाबत आवश्यक जबाबदारी संबंधित शाळेने घ्यावी. शाळांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने पालकांसमवेत संवाद सत्राचे आयोजन करावे. शाळांतील शिक्षकांसमवेत शिक्षकेतर कर्मचारी तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत प्रशिक्षण द्यावे. विद्यार्थ्यांना ‘गुड टच आणि बॅड टच’ बाबत अवगत करावे. शाळेमध्ये वावरताना विद्यार्थ्यांच्या मनात सुरक्षितेतची भावना निर्माण व्हावी, अशा प्रकारचे पोषक वातावरण शाळेत निर्माण करावे.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

> “ शाळांमध्ये आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही बसविणे, सखी सावित्री समितीची स्थापना करणे, मुलांच्या सुरक्षिततेबाबत काही संशयास्पद आढळल्यास त्वरित पोलीस प्रशासनास कळविणे, शाळेमध्ये नियुक्त केल्या जाणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या चारित्र्य प्रमाणपत्राची पडताळणी करणे तसेच दामिनी पथकासोबत योग्य समन्वय साधून विद्यार्थ्यांना सुरक्षिततेबाबत प्रशिक्षण देणे आदी उपाययोजनांचा करणे आवश्यक आहे. यासाठी पोलीस प्रशासनाचेही सहकार्य शाळांना लाभणार आहे. तसेच रात्री १० ते सकाळी ७ वाजेपर्यंत महिलांना प्रवासादरम्यान किंवा कोणत्याही ठिकाणी असुरक्षित वाटल्यास त्या ११२ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात. पोलीसांच्या वतीने त्यांना तात्काळ मदत पोहोचविण्याची कार्यवाही केली जाईल. तसेच सुरक्षित स्थळी त्यांना पोहोचविण्यात येईल.
>
> **- पृथ्वीराज बी पी. अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका.**

# गणेश मंडळांनी जबरदस्तीने वर्गणी मागितल्यास कडक कारवाई; पोलीस आयुक्त चौबे यांचा इशारा

## पिंपरी चिंचवड आयुक्तालयात पार पडलेल्या या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले, त्यावर चर्चा झाली

**पिंपरी | प्रतिनिधी**

गणेश मंडळांनी जबरदस्तीने वर्गणी गोळा केल्यास त्या मंडळांवर कडक कारवाई करण्यात येईल असा इशारा पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी आयुक्तालयात पार पडलेल्या मध्यवर्ती शांतता समितीच्या बैठकीत दिला आहे. या बैठकीला सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अप्पर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, आमदार उमा खापरे आणि आमदार अमित गोरखे हे उपस्थित होते.



पिंपरी चिंचवड आयुक्तालयात पार पडलेल्या या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यावर चर्चा झाली. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील गणेश उत्सव शांततेत पार पडावा यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. गणेश मंडळांनी धर्मादाय आयुक्तालयाच्या नियमानुसार नोंदणी करणे अपेक्षित आहे. अन्यथा त्या मंडळावर कारवाई दाखल करण्यात येईल. त्याचबरोबर गणेश मंडळांनी नोंदणी नसताना नागरिकांकडून जबरदस्तीने वर्गणी गोळा केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. असा इशारा पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिला आहे. गणेश उत्सव म्हटलं की डीजेचा आवाज आलाच. महिला, रुग्ण, लहान मुले, वृद्ध व्यक्ती यांना जास्त त्रास सहन करावा लागणार नाही, याबाबत पोलिसांचं नियंत्रण यावर असणार असल्याचेही विनयकुमार चौबे यांनी म्हटले आहे.

# पालिकेच्या पथ विभागाची खासगी कंपन्यांकडून हॉटमिक्स खरेदीची तयारी

## पालिकेच्या पथ विभागाने रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याची मोहीम सुरू केली होती, पावसामुळे हॉटमिक्स मिळण्यात अडचण येत होती

**पुणे | प्रतिनिधी**

पालिकेच्या पथ विभागाने रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याची मोहीम सुरू केली होती. पावसामुळे हॉटमिक्स मिळण्यात अडचण येत होती. तसेच येरवड्यातील हॉटमिक्स प्रकल्पाच्या मर्यादिमुळे खड्डे बुजवा मोहीम रेंगाळली. आता राष्ट्रपतींचा आणि अन्य व्हीआयपींचे दौरे असल्याने काही करून खड्डे बुजवावे लागणार आहेत.

पालिकेच्या पथ विभागाने रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याची मोहीम सुरू केली होती. पावसामुळे हॉटमिक्स मिळण्यात अडचण येत होती. तसेच येरवड्यातील हॉटमिक्स प्रकल्पाच्या मर्यादिमुळे खड्डे बुजवा मोहीम रेंगाळली. आता राष्ट्रपतींचा आणि अन्य व्हीआयपींचे दौरे असल्याने काही करून खड्डे बुजवावे लागणार आहेत. त्यामुळे पथ विभाग दोन खासगी कंपन्यांकडून हॉटमिक्स खरेदी करणार असून त्याची तयारी सुरू केली आहे. याचा निर्णय झाल्यानंतर खड्डे बुजवण्यास वेग येईल.

मुसळधार पावसाने रस्त्यांची वाट लागली असून खड्डयांमुळे अपघातांचे सत्र सुरू आहे. पालिकेने मध्यंतरी महिनाभरात चार हजार सातशे ६६ खड्डे बुजवल्याचा दावा केला होता. पाऊस सुरूच असल्याने खड्डे बुजवण्याच्या कामाला मर्यादा येत आहेत, असे पथ विभागाचे म्हणणे आहे.

मात्र, त्यानंतरही रस्त्यावर मोठे खड्डे दिसत असल्याने पालिकेने नेमके खड्डे कोणते बुजवले असा प्रश्न पुणेकरांकडून उपस्थित करण्यात आला. आता सणासुदीचे दिवस आणि व्हीआयपींच्या दौऱ्यांमुळे काही करून खड्डे बुजवा असा वरिष्ठ पातळीवरून आदेश आला आहे.

त्यामुळे पालिकेने युध्द पातळीवर खड्डे बुजवण्याचे काम पुन्हा हाती घेतले आहे. मात्र, खड्डे वाढत असून वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. त्यातच विविध शासकीय संस्था, महापालिकेतर्फे पायाभूत सुविधासाठी खोदाईची कामे हाती घेण्यात येतात. त्यामुळे आणि सततच्या पावसामुळे शहरात मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत.



### डागडुजीसाठी दीड कोटी

» राजपूत झोपडपट्टी ते बाबा भिडे पूल दरम्यान नदीपात्रातील रस्त्याची चाळण झाली आहे. काही तांत्रिक अडचणींमुळे रस्त्याचे काम नव्याने करता येत नाही. त्यामुळे रस्त्याची डागडुजी केली जाणार आहे. त्यासाठी तब्बल दीड कोटी रुपये खर्च होणार आहेत. या खर्चाला वित्त समितीने मान्यता दिली आहे. येत्या आठवड्यात कामासाठी निविदा प्रसिध्द केली जाणार आहे.

### 26 ऑगस्टपासून बुजवलेले खड्डे

- बुजवलेल्या एकूण खड्डयांची संख्या ४३२
- वापरलेला डांबरी माल १३३४.७७ मेट्रिक टन
- एकूण क्षेत्रफळ १९८१ चौरस मीटर
- दुरुस्त केलेल्या चेंबरची संख्या ३६

> रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याचे काम महापालिकेकडून वेगाने सुरू आहे. रात्रीच्या वेळी खड्डे बुजवले जात आहेत. पावसामुळे खडी ओलसर राहिल्याने हॉटमिक्स मिळण्यास मर्यादा येत आहे. येरवड्यातील हॉटमिक्स प्रकल्पाच्या मर्यादिमुळे दोन खासगी कंपन्यांकडून हॉटमिक्स घेण्याची तयारी सुरू केली आहे.
>
> - अनिरुध्द पावसकर, प्रमुख, पथ विभाग, पुणे महापालिका.

# अंतिम मतदार यादी प्रसिद्ध; जिल्ह्यात 86 लाख 47 हजार 172 मतदार

## जिल्ह्याची अंतिम मतदार यादी उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांच्या हस्ते प्रसिद्ध करण्यात आली.

**पुणे | प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमानुसार जिल्ह्याची अंतिम मतदार यादी उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांच्या हस्ते प्रसिद्ध करण्यात आली. या यादीनुसार जिल्ह्यात ४४ लाख ९१ हजार ६८ पुरुष, ४१ लाख ५५ हजार ३३० महिला आणि ७७४ तृतीयपंथीय असे एकूण ८६ लाख ४७ हजार १७२ मतदार आहेत, अशी माहिती श्रीमती कळसकर यांनी यावेळी दिली. यावेळी तहसीलदार शीतल मुळे, राहूल सारंग तसेच राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



जुन्नर विधानसभा मतदासंघात ३५६ मतदान केंद्रे आणि १ लाख ६३ हजार २२४ पुरुष, महिला १ लाख ५७ हजार २४२ तसेच तृतीयपंथीय ४ असे एकूण ३ लाख २० हजार ४७० मतदार आहेत.आंबेगाव मतदार संघात ३४१ मतदान केंद्र असून पुरुष मतदार १ लाख ५७ हजार ४९४, महिला १ लाख ५१ हजार ७०३ आणि तृतीयपंथीय ९ असे एकूण ३ लाख ९ हजार २०६ मतदार आहेत.खेड आळंदी मतदार संघात ३८९ मतदान केंद्र, पुरुष मतदार १ लाख ८९ हजार ४४४, महिला १ लाख ७७ हजार ४१७ आणि तृतीयपंथीय १२ असे एकूण ३ लाख ६६ हजार ८७३ मतदार आहेत.शिरूर मतदार संघात ४५७ मतदार केंद्र, पुरुष २ लाख ३७ हजार १९७, महिला २ लाख १८ हजार ३२० आणि तृतीयपंथीय २३ असे एकूण ४ लाख ५५ हजार ५४० मतदार आहेत.दौंड मतदार संघात ३१० मतदान केंद्र, पुरुष संख्या १ लाख ६१ हजार २५१, महिला १ लाख ५१ हजार ८४७ आणि तृतीयपंथीय १२ असे एकूण ३ लाख १३ हजार ११० मतदार आहेत.इंदापूर मतदार संघात ३३७ मतदान केंद्र असून १ लाख ७१ हजार ४२१ पुरुष, १ लाख ६१ हजार ५९६ महिला आणि तृतीयपंथीय १३ असे ३ लाख ३३ हजार ३० मतदार आहेत.बारामती मतदार संघात ३८६ मतदान केंद्रे, पुरुष मतदार १ लाख ९० हजार ८४१, महिला १ लाख ८४ हजार २९० आणि तृतीयपंथीय २१ असे ३ लाख ७५ हजार १५२ मतदार आहेत.पुरंदर मतदार संघात ४१३ मतदान केंद्रे, पुरुष मतदार २ लाख ३५ हजार २६१, महिला २ लाख १६ हजार ५०७ आणि तृतीयपंथीय ३२ असे ४ लाख ५१ हजार ८०० मतदार आहेत.भोर मतदार संघात ५६४ मतदान केंद्र, पुरुष २ लाख २३ हजार ३५६, महिला १ लाख ९८ हजार १९१ आणि तृतीयपंथीय ६ असे ४ लाख २१ हजार ५५३ मतदार आहेत.मावळ मतदार संघात ४०२ मतदान केंद्र, पुरुष १ लाख ९४ हजार २१५, महिला १ लाख ८४ हजार ६१६ आणि तृतीयपंथीय १३ असे ३ लाख ७८ हजार ८४४ मतदार आहेत.चिंचवड मतदार संघात ५६१ मतदान केंद्र, ३ लाख ३९ हजार ७२७ पुरुष, ३ लाख ३ हजार ९८९ महिला आणि तृतीयपंथीय ५३ असे ६ लाख ४३ हजार ७६९ मतदार आहेत.पिंपरी (अ.जा.) मतदार संघात ३९८ मतदान केंद्रे, पुरुष २ लाख ७९२, महिला १ लाख ८३ हजार १२ आणि तृतीयपंथीय ३० असे ३ लाख ८३ हजार ८३४ मतदार आहेत. भोसरी मतदार संघात ४८३ मतदान केंद्रे, पुरुष मतदार ३ लाख १८ हजार ५७८, महिला २ लाख ६८ हजार २२० आणि तृतीयपंथीय ९७ असे ५ लाख ८६ हजार ८९५ मतदार आहेत.वडगांव शेरी मतदार संघात ४३७ मतदान केंद्रे, पुरुष २ लाख ५३ हजार ११६, महिला २ लाख ३६ हजार २७६ आणि तृतीयपंथीय १०२ असे एकूण ४ लाख ८९ हजार ४९४ मतदार आहेत. शिवाजीनगर मतदार संघ - २८० मतदान केंद्रे, पुरुष १ लाख ४६ हजार १२९, महिला १ लाख ४३ हजार ५८७ आणि तृतीयपंथीय ४६ असे २ लाख ८९ हजार ७६२ मतदार,कोथरूड मतदार संघ- ३८७ मतदान केंद्रे, पुरुष २ लाख २५ हजार ५०, महिला २ लाख ६ हजार ५७८ आणि तृतीयपंथीय २३ असे ४ लाख ३१ हजार ६५१ मतदार आहेत.खडकवासला मतदार संघात ५०५ मतदान केंद्रे, पुरुष मतदार २ लाख ९७ हजार २०३, महिला २ लाख ६४ हजार ७१२ आणि तृतीयपंथीय ४० असे ५ लाख ६१ हजार ९५५ मतदार आहेत.पर्वती मतदार संघात ३४४ मतदान केंद्रे, पुरुष १ लाख ८० हजार २२, महिला १ लाख ७३ हजार ९४५ आणि तृतीयपंथीय ९५ असे एकूण ३ लाख ५४ हजार ६२ मतदार आहेत.हडपसर मतदार संघात ५२५ मतदार केंद्रे, पुरुष मतदार ३ लाख २० हजार २६०, महिला २ लाख ८७ हजार ८४२ आणि तृतीयपंथीय ७२ असे ६ लाख ८ हजार १७४ मतदार आहेत.पुणे कॅन्टोन्मेंट (अ.जा.) मतदार संघात २७४ मतदान केंद्रे असून यात १ लाख ४७ हजार ४९५ पुरुष, १ लाख ४३ हजार १६९ महिला आणि ३४ तृतीयपंथीय असे २ लाख ९० हजार ६९८ मतदार आहेत.कसबा पेठ मतदार संघात २६८ मतदान केंद्रे, पुरुष मतदार १ लाख ३८ हजार ९१२, महिला १ लाख ४२ हजार २७१ आणि तृतीयपंथीय ३७ असे २ लाख ८१ हजार ३०० मतदार आहेत.

# पिंपळे सौदागरमधील कुणाल आयकॉन रस्त्याला ‘गती’

## माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांच्या प्रशासनाला सूचना : पावसाळ्यात पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे सौदागर मधील रहदारीचा ”हॉटस्पॉट” मानला जाणाऱ्या कुणाल आयकॅान रस्त्याचा शिवार गार्डन ते कुंजीर चौका पर्यतच्या कामाला लवकर सुरुवात होणार आहे .या कामाची शुक्रवारी पिंपरी चिंचवड महापालिकेचे माजी विरोधी पक्ष नेते नाना काटे यांनी संबधित महापालिकेच्या बीआरटीएस विभागाचे अधिकारी व सल्लागार यांच्या समवेत पाहणी केली. पिंपळे सौदागर भागातील हा रहदारीचा मुख्य रस्ता असल्याने वाहतुकीचे योग्य नियोजन करून काम करण्यात यावे. तसेच या रस्त्यामध्ये येणाऱ्या सेवावाहिन्यांचे पुढील 30 ते 40 वर्षांचे योग्य रीतीने नियोजन केले जावे अशा सूचना काटे यांनी अधिकाऱ्यांना केल्या.



कुणाल आयकॅान रस्त्यावरील शिवार गार्डन चौक ते कुंजीर चौक या रस्त्याच्या कामाची पाहणी करताना शुक्रवारी माजी विरोधी पक्षनेते नाना काटे तसेच बीआरटीएस विभागाच्या कार्यकारी अभियंत्या संध्या वाघ, उपअभियंता विजय भोजने, सल्लागार समिती इन्फ्रा किंग प्रा ली चे प्रतिनीधी लक्ष्मीकांत पतंगे, रणजीत कोल्हे तसेच परिसरातील सोसायटी मधील रहिवासी, जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

याबाबत नाना काटे म्हणाले शिवार गार्डन चौक ते कुंजीर चौक हा 18 मीटर रुंदीचा रस्ता अर्बन स्ट्रीट डेव्हलपमेंट पद्धतीने विकसित करण्यात येणार आहे. पिंपळे सौदागरमधील बहुतांश रस्ते अर्बन स्ट्रीट डेव्हलपमेंट अंतर्गत विकसित करण्यात आले आहे. या भागातील मुख्य चौक आणि रहदारीचा मानला जाणारा कुणाल आयकॅान रस्ता येथील रस्त्याचे काम राहिले होते. प्राधान्याने हे काम आता हाती घेण्यात आले आहे. या रस्त्यावर प्रचंड रहदारी असते. वाहतुकीचा ताण असतो.

> “ पिंपळे सौदागर येथील अर्बन स्ट्रीट अंतर्गत कुणाल रस्त्याचे शिवार गार्डन ते कुंजीर चौक रस्ता काँक्रीटीकरणाने विकसित करण्याचे नियोजन आहे. सध्या निविदा प्रक्रिया चालू असून ती अंतिम टप्यात आहे. काम चालू होण्यास साधारणतः दोन महिन्यांचा कालावधी लागणार असून तीन वर्षांमध्ये हे काम पूर्ण केले जाणार आहे . तसेच आगामी काळातील नियोजन डोळ्यासमोर ठेवून वाढीव व्यासाच्या वाहिन्या टाकण्यात येणार आहे.
>
> **- नाना काटे, माजी विरोधी पक्षनेता, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

त्यामुळे या रस्त्याचे काम उशिरा हाती घेण्यात आले. या परिसरात व्यापारीकरण मोठ्या प्रमाणात आहे. अनेक छोटे मोठे व्यापारी येथे विविध प्रकारचे व्यवसाय करतात. नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने छोटी बाजारपेठ या ठिकाणी उपलब्ध आहे. त्यामुळे हा रस्ता या भागातील नागरिकांसाठी महत्त्वाचा आहे. तो योग्य रीतीने विकसित झाला पाहिजे अशी भूमिका सुरुवातीपासून होती. वाहतुकीचे योग्य प्रकारे नियोजन करून या चौकातील रस्त्याचे काम करावे लागणार आहे . सुरुवातीला हे काम करताना या रस्त्याच्या खाली असणाऱ्या सेवा वाहिन्या फूटपाथअंतर्गत घेऊन स्थलांतरित करण्याचे काम केले जाणार आहे. आगामी काळातील लोकसंख्या लक्षात घेऊन रस्त्याचे काम करतानाच जलनिस्सारण ,मलनिस्सारण, पाणीपुरवठा आणि विद्युत वाहिन्यांचे नियोजन करावे अशी सूचना अधिकाऱ्याना केली आहे. या रस्त्याचे काम झाल्यानंतर या चौकाला आधुनिक चेहरा मिळणार आहे. दळणवळण सुटसुटीत होणार असून वाहतुकीची कोंडी प्रामुख्याने टाळता येणार आहे तसेच प्रदूषण कमी होईल.

# अर्बन स्ट्रीट डिझाईननंतरही वाहतूक कोंडी कायम

## शहरात अफाट पैसा खर्च करून रस्ते झाले छोटे : ऐसपैस पदपथावर दुकानदार, विक्रेते, वाहनचालकांचे अतिक्रमण

**पिंपरी | प्रतिनिधी**

पालिकेच्या शहरी पथ धोरणांतर्गत (अर्बन स्ट्रीट गाइड लाइन्स) काही मुख्य रस्ते विकसित केले जात असून जुन्या पुणे-मुंबई रस्त्यावर १५० कोटी खर्च करून सायकल ट्रॅक, पदपथ, फुटपाथ, सुशोभीकरण केले जात आहे. या सगळ्यामुळे वर्दळीचा रस्ता अरुंद झाला असून पार्किंग, वाहतूक कोंडीचा प्रश्न उग्र होणार आहे. अफाट पैसा खर्च करून रस्ते झाले छोटे, पदपथ झाले मोठे असे चित्र सर्वत्र दिसत आहे. दिसेल तेथे पार्किंग केले जात असल्याने वाहतूक कोंडी जागोजाग वाढली असून पदपथावर अतिक्रमण झाल्याने नागरिकांना चालण्यासाठी जागाच राहिलेली नाही.



भविष्यातील वाहतूक कोंडी प्रश्नाचा जन्म झाला असून आता शहरात वाहतूक कोंडी, पार्किंग समस्या जाणवू लागली आहे. त्यातच पालिकेने हे धोरण ठरविताना वाहतूक पोलिसांना अंधारात ठेवल्याने कोंडी सोडवताना त्यांची दमछाक होत आहे. शहरी पथ धोरणामुळे दापोडी ते पिंपरी आणि पिंपरी ते निगडी हा सेवा रस्ता साधारणपणे ७.५ मीटर वाहतुकीसाठी वापरता येणार आहे. त्यामुळे हा रस्ता अरुंद होऊन भविष्यात पार्किंग आणि वाहतूक कोंडीचा प्रश्न उग्र होणार आहे.

शहरी पथ धोरणांतर्गत (अर्बन स्ट्रीट गाइड लाइन्स) सार्वजनिक वाहतुकीसाठी सुसज्ज रस्ते, पादचारी मार्ग, सायकल स्वारांसाठी सायकल मार्ग, टू व्हीलर आणि फोर व्हीलरला पार्किंग स्पॉट, आकर्षक पथदिवे, सुशोभीकरण या सुविधा नागरिकांना देण्याचा प्रयत्न आहे.

शहरी पथ धोरणामुळे वाहने पदपथ व रस्त्यांवर उभी केली जातात. त्यामुळे रस्ते अरुंद होऊन वाहतूक कोंडीची समस्या आणखी भेडसावत आहे. तरीही पालिकेकडून अर्बन स्ट्रीट डिझाईनच्या नावाखाली रस्ते छोटे आणि फूटपाथ मोठे करत आहे. अधिकारी, ठेकेदार आणि राजकारण्यांच्या निव्वळ टक्केवारी खेळासाठी ही उधळपट्टी होत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे.

दापोडी ते निगडी या १२.५० किलोमीटर अंतराच्या मार्गावर १८३ फूट रुंदीचा प्रशस्त ग्रेडसेपरेटर मार्ग आहे. हा दहा पदरी रस्ता आहे.

### पदपथांवर 568 कोटींचा चुराडा

**» अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार ठिकठिकाणी सायकल ट्रॅक उभारण्यात येत असून पादचारी मार्ग प्रशस्त बनवून आकर्षक केले जात आहेत. याच रस्त्यांना आता अतिक्रमणांचे ग्रहण लागले आहे. पालिकेच्या स्थापत्य प्रकल्प विभागाकडून पुणे-मुंबई महामार्ग, टेल्को रोड ते बालाजीनगर, पवना ब्रिज ते डांगे चौक, डांगे चौक ते भूमकर चौक आणि शिवार चौक ते गोविंद गार्डन हॉटेल हे रस्ते ‘विकसित करण्यात येत आहेत. स्थापत्य विभागाने संत तुकाराम नगर ते यशवंत नगर यासह अन्य काही रस्ते विकसित करायला घेतले आहेत. त्यावर सुमारे २०० कोटी रुपये खर्च झालेला असून, इतर रस्ते सुशोभीकरणाचा हा प्रकल्प अजूनही सुरू आहे. शहरातील प्रमुख रस्त्यांवर आणि पदपथांवर सुमारे ५६८ कोटी खर्च होणार आहे.**

चार पदरी काँक्रिटचा एक्सप्रेस वे आहे. चार पदरी सर्व्हिस रस्ता आहे. दोन पदरी बीआरटीएस मार्ग आहे. रस्त्यांवर मोठ्या संख्येने वाहनांची ये-जा असून वाहनांना पार्किंगची सुविधा उपलब्ध नाही. नाईलाजास्तव वाहनचालकांना रस्ता, पदपथावर वाहने पार्क करावे लागत आहे. दापोडी ते पिंपरी रस्त्यावर पिलर आहेत. त्यातच पिंपरी ते निगडी मेट्रोचे काम सुरू आहे. पार्किंग झोन तयार करून वाहतूक कोंडी सोडवण्याऐवजी रस्ता आणखी कमी केला जात आहे.

प्रायोगिक तत्त्वावर पालिकेसमोर ठेकेदाराने अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार पदपथाची रुंदी वाढविण्याचे काम हाती घेतले आहे. त्या कामासाठी तब्बल १५० कोटींचा खर्च केला जाणार आहे. प्रशस्त रस्त्यांची रुंदी कमी करून पदपथ मोठे केले जात आहेत. त्यात सर्व्हिस रोड कमी झाल्याने वाहतूक कोंडीत भर पडणार आहे.

# शहरातील कॅमेरे बंद नसल्याचा आयुक्तांचा दावा!

## महापालिकेकडून बसविण्यात आलेले एक हजार 54 सीसीटीव्ही कॅमेरे बंद : महापालिकाच सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्त करणार

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेकडून बसविण्यात आलेले एक हजार ५४ सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती. यामुळे शहरात खळबळ उडाली होती. त्यात हे कॅमेरे पोलिसांनी दुरुस्त करायचे की पुणे महापालिकेवरून यावरुन देखील चांगलाच वाद सुरु असल्याचे समोर आले होते. पुणेकरांची सुरक्षाच वाऱ्यावर गेली असल्याने पुणेकरांनी संताप व्यक्त केला होता. त्यानंतर शहराती सीसीटीव्ही कॅमेरे बंद नाहीत असा दावा करत केवळ त्यात काही किरकोळ दुरुस्ती आहे, ती महापालिकेच करेल, असे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी जाहीर केल्याने पुणेकरांना मोठा दिलासा मिळाला आहे.



शहरात होत असलेल्या मुसळधार पावसाने पुणेकरांना चांगलेच जेरीस आणले आहे. पावसामुळे पुणेकरांची काळजी घेणारा पुणे महापालिकेने बसवलेले तिसरा डोळा बंद पडल्याची माहिती समोर आली होती. यामाहिती समोर येताच महापालिका प्रशासनावर पुणेकरांकडून प्रश्नांची सरबत्ती करण्यात आली आहे. शहरातील सुमारे एकोणतीशे सीसीटीव्ही कॅमेरे पैकी एक हजार ५४ सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत. हे कॅमरे पावसामुळे बंद पडले वादळीवाऱ्यात अनेक कॅमेऱ्यांच्या केबल तुटल्या आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हे कॅमेरे तात्काळ दुरुस्त करणे अपेक्षित असताना देखभाल दुरुस्ती महापालिकेकडे आर्थिक तरतदूच नसल्याचे सांगण्यात आले होते. रस्त्यावरील कॅमेरे महापालिकेने नव्हे तर पोलिसांनीच दुरुस्त करावेत असे काही अधिकाऱ्यांचे म्हणणे होते. कॅमेरे बसविण्यात आल्यानंतर महापालिकेने एकदाही या कॅमेऱ्यांची देखभाल दुरुस्ती केली नसल्याचेही समोर आले आहे. एरवी महापालिका नको त्या गोष्टीवर मोठा खर्च करते. कोणतेही नियोजन नसताना टेंडर काढते. बाजार दरापेक्षा अधिक पैसे खर्च करुन एखादे काम करते. रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी करोडो रुपये खर्च करते. तर पुणेकरांची सुरक्षिता महत्वाची असताना महापालिका आखता हात का घेते असाही प्रश्न पुणेकरांनी उपस्थित केला होता.

दरम्यान शहरात गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होत आहे. शहरात येणाऱ्यांची संख्या वाढणार आहे. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने विचार केला असता, हे कॅमेरे आता महापालिकाच दुरुस्त करणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

महापालिकेने नगरसेवकांच्या निधीतून शहराच्या अनेक भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. त्यानंतर महापालिकेत गेल्या तीन वर्षांपासून प्रशासकराज सुरु आहे. त्यामुळे महापालिकेच्या तिसऱ्या डोळ्याकडे कोणाचेच लक्ष नसल्याचेही बोलले जाऊ लागले आहे. हे कॅमेरे हे संबंधित पोलीस ठाणे किंवा पोलीस चौकीतील कंट्रोल रुममध्ये जोडले गेले आहे. चार वर्षांपूर्वी हे कॅमेरे बसविण्याचे प्रमाण अधिक होते. त्याचा सुरुवातीच्या कालावधीत पोलिसांना उपयोग झाला. अनेक गुन्ह्यांचा माग काढण्यात कॅमेरे महत्वाचे ठरले, परंतु आता हे सीसीटीव्ही कॅमेरेच बंद अवस्थेत आहे.

### शहराच्या मध्यभागातील कॅमेरे बंद..

» संभाजी पोलीस चौकी, नारायणपेठ पोलीस चौकी, शनिवार पेठ पोलीस चौकी, खडक पोलीस चौकी, सेनादत्त पोलीस चौकी, मंडई पोलीस चौकी, मिठगंज पोलीस चौकी, पेरुगेट पोलीस चौकी, कसबा पेठ पोलीस चौकी, ताडीवाला रोड पोलीस चौकी आदी भागाचा समावेश आहे. विशेष म्हणजे गणेशोत्सवात याच चौकींच्या भागांत मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. याच चौकींच्या भागातून गणेश विसर्जन मिरवणुक मार्गस्थ होत असते.

“ महापालिका आणि पोलीस प्रशासन असा कोणताही वाद नाही. महापालिकेने बसविलेले सीसीटीव्ही कॅमेरे बंद नाहीत. मात्र, त्यात काही किरकोळ दुरुस्ती करावी लागणार आहे. ती महापालिकेकडूनच केली जाईल. गणपती असल्याने त्यापूर्वीच ते दुरुस्त केले जातील.

**- डॉ. राजेंद्र भोसले, आयुक्त, पुणे महापालिका.**

# गणेशखिंड रस्त्याच्या दुस्तीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

## महापालिकेच्या कोणत्याच आदेशाला पीएमआरए जुमानत नसल्याचे पुन्हा एकदा समोर

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा शहरात २ आणि ३ सप्टेंबरला दौरा होणार आहे. या दौऱ्याच्या निमित्ताने पुणे महापालिकेने गणेशखिंड रस्त्याची दुरुस्ती करण्याने पीएमआरडीएला लिहिले होते. मात्र, पत्राला कोणतेही उत्तर न देता दुरुस्तीकरण्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे महापालिकेच्या कोणत्याच आदेशाला पीएमआरए जुमानत नसल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे.

पुणे शहरातील रस्त्यांवर पावसाने खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहतून कोंडी होत असल्याने वाहन चालक चांगलेच त्रासले आहेत. रस्त्यावर खड्डे असल्याने वाहतूक संथ गतीने सुरु आहे. याचा फटका राष्ट्रपतींच्या दौऱ्यावर पडू नये, यासाठी महापालिकेच्या पथ विभागाकडून खड्डे बुजवण्यासाठी धावाधाव सुरु आहे. गणेशखिंड रस्त्यावर पीएमआरडीएकडून हिंजवडी ते शिवाजीनगर या दरम्यानच्या मेट्रोचे काम चालू आहे. . या कामासाठी गणेशखिंड रस्त्यावरील विद्यापीठ चौकातील दुहेरी उड्डाणपुल पाडण्यात आला आहे. या चौकात मेट्रो, ग्रेडसेपरेटर व उड्डाणपुल असे प्रस्तावित करण्यात आले आहे. सध्या गणेशखिंड रस्त्यावर मेट्रो व विद्यापीठ चौकात दुहेरी उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती करण्याची जबाबदारी पीएमआरडीए व मेट्रो प्रकल्पाचे काम करणाऱ्या कंपनीची आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून ते बुजवण्याची जबाबदारी ही पीएमएआरडीएची असून तात्काळ खड्डे बुजवण्याचा सूचना महापालिकेच्या पथ विभागाने केली आहे. मात्र, यापत्राला थेट केराची टोपली पीएमएआरडीए दाखविली आहे. पीएमएआरडीए महापालिकेला कोणत्याही प्रकारे सहकार्य करत नसल्याची तक्रार महापालिकेकडून केला जात आहे. त्यामुळे पालिकेच्या पथ विभागानेच स्वत:हून गणेशखिंड रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. या कामाचा खर्च कोण करणार हे मात्र, अद्याप स्पष्ट करण्यात आलेले नाही.



दरम्यान, गेल्या आठवडयात राज्यपाल यांच्या दौऱ्यापुर्वी देखील पीएमआरडीएला या भागातील खड्डे तातडीने बुजविणे तसेच खचलेले चेंबर हे रस्त्यांच्या समपातळीत घेण्यासंदर्भात कळविण्यात आले होते. परंतु अद्यापही काम पुर्ण करण्यात आलेले नाही. ३ सप्टेंबर रोजी राष्ट्रपती यांचा पुणे दौरा नियोजित आहे. या दौऱ्यापूर्वी आपल्या कार्यक्षेत्रामधील सर्व रस्ते दुरूस्तीची कामे पुर्ण करून घेण्यात यावी. अशी विनंती पुणे महापालिकेने पीएमआरडीएला पाठवलेल्या पत्रात केली होती. मात्र राज्यपाल असो कि राष्ट्रपती यांचा दौरा असली तरी निगरगट्ट पीएमआरडीएला कोणताही फरक पडत नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे भविष्यात प्रशासकीय वाद होण्याची चिन्हे दिसून येत आहेत.

“ महापालिकेच्या हद्दीत पीएमआरडीएचे विविध प्रकल्प सुरु आहेत. गणेशखिंड रस्त्यावर पीएमआरडीएकडून मेट्रोचे काम सुरु आहे. हा प्रकल्प केंद्र सरकारचा असल्याने महापालिकेकडून पूर्ण सहकार्य केले जाते. परंतु, पीएमआरडीए कोणत्याही प्रकारेचे सहकार्य करताना दिसून येत नाही. खरे तर या रस्त्यावरील खड्डे बुजवण्याची त्यांची जबाबदारी आहे. परंतु शहरातील रस्त्याची जबाबदारी म्हणून महापालिकेनेच आता स्वत: हून रस्ते दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. केलेल्या कामाचे बील पीएमआरडीएला पाठवले जाईल. त्यांच्याकडून पूर्ण वसूली केली जाईल.

**- अनिरुध्द पावसकर, प्रमुख पथ विभाग, पुणे महानगरपालिका.**